Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
Date 04 November 2026
Time 11.00 to 11.05 AM
Language Marathi
आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
प्रादेशिक बातम्या
दिनांक ०४ नोव्हेंबर २०२६ सकाळी ११.०० वाजता

****

राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून 'महाराष्ट्र पब्लिक रिलीफ सोसायटी'ची स्थापना करण्यात आली आहे. कंपन्या, संस्था, देणगीदार आणि इतर सामाजिक घटकांच्या सहभागातून अतिरिक्त निधी उभारून तो गरजू रुग्णांसह विविध आपत्तींत बाधित नागरिकांच्या मदतीसाठी वापरता येण्यासंदर्भात पर्याय तपासण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले होते, त्यानुसार हे पाऊल उचलण्यात आलं आहे. यामुळे महागड्या उपचारांची गरज असलेल्या रुग्णांना अधिक आर्थिक मदत देण्याबरोबरच दुष्काळ, नैसर्गिक आपत्ती आणि अन्य आपत्कालीन परिस्थितीतही मदतीचा हात पुढे करता येणार आहे.

****

राज्यात सुट्या खाद्यतेलाच्या विक्रीसाठी देण्यात आलेली एक वर्षाची मुदतवाढ कायम ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंत्रालयात झालेल्या बैठकीनंतर ही माहिती दिली. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर घेतलेल्या या निर्णयामुळे पारंपरिक पद्धतीनं खाद्यतेल विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांना व्यवसाय सुरू ठेवता येणार आहे. सुट्या खाद्यतेलाच्या विक्रीबाबत व्यवहार्य धोरण निश्चित करण्यासाठी सर्व संबंधित घटकांशी चर्चा करून समिती गठीत करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

****

जालना शहरातल्या संभाव्य पाणीटंचाईवर मात करण्यासाठी पाण्याचे पर्यायी स्रोत शोधून नियोजन करावं, तसंच शहर पाणीपुरवठा योजनेसाठी निधीचा प्रस्ताव तातडीने सादर करावा, असे निर्देश पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी दिले.

महानगरपालिकेतली विकासकामं आणि पाणीटंचाईचा आढावा घेताना त्या काल बोलत होत्या.

दरम्यान, जालना शहरातल्या लोकमान्य टिळक आणि हुतात्मा स्मारक वाचनालय या नूतनीकृत वाचनालयांचं आणि मोतीबाग ग्लो गार्डनचं लोकार्पण काल मुंडे यांच्या हस्ते झालं.

****

छत्रपती संभाजीनगर मध्यवर्ती बसस्थानकाचं लवकरच अत्याधुनिक बसपोर्टमध्ये रूपांतर करण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा परिवहन महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. छत्रपती संभाजीनगर इथल्या मध्यवर्ती बसस्थानकाची पाहणी केल्यानंतर ते काल बोलत होते. या प्रकल्पासाठी पुढील तीन महिन्यांत निविदा प्रक्रिया राबवण्यात येणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

****

बीड जिल्ह्यातल्या दुष्काळी परिस्थितीत पशुधनाचं संरक्षण करण्यासाठी सहकारी बँक कर्मचारी संघटनेने पाच लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. या मदतीचं पत्र काल जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्याकडे सुपूर्द करण्यात आलं.

****

केंद्र सरकारच्या युवा कार्यक्रम आणि क्रीडा मंत्रालयाच्या वतीनं 'मेरा युवा भारत' अंतर्गत गडचिरोली जिल्ह्यात चामोर्शी इथल्या केवळरामजी हरडे कृषी महाविद्यालयात 'विकसित भारत युवा संवाद' आणि 'नो युवर व्होट' या विशेष कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. या कार्यक्रमातून लोकशाही प्रक्रियेत तरुणांचा सहभाग, मतदानाचं महत्त्व आणि विकसित भारताच्या संकल्पनेत युवा नेतृत्वाची भूमिका याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आलं.

अहिल्यानगर जिल्ह्यात शेवगाव इथल्या आयुर्वेद, फार्मसी आणि नर्सिंग महाविद्यालयातही याअंतर्गत विद्यार्थ्यांना मतदानाचं महत्त्व पटवून देण्यात आलं. तसंच लोकशाही हक्क आणि कर्तव्यांबाबत मार्गदर्शन करण्यात आलं.

****

धुळे जिल्ह्यात अन्न आणि औषध प्रशासन तसंच राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने केलेल्या दोन वेगवेगळ्या कारवायांमध्ये प्रतिबंधित ३० लाख रुपये किमतीचा गुटखा, पान मसाला तसंच बेकायदेशीर मद्यासह पाच पाच लाख रुपयांचा

मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. पिंपळनेर आणि धुळे शहारानजिक साक्री रोडवर हॉटेल काठेवाडी जवळ ही कारवाई करण्यात आली.

****

बीड जिल्ह्यात आष्टीजवळील शृंगेरी घाटात ब्रेक फेल झाल्याने ऊस वाहतुकीचा रिकामा ट्रक खोल दरीत कोसळून पेटल्याची भीषण घटना घडली. या दुर्घटनेत चालक सागर इंदलकर यांचा आगीत होरपळून मृत्यू झाला. ट्रकच्या आगीमुळे लगतच्या डोंगरालाही आग लागल्याचं वृत्त आहे.

****

महिला बचत गटांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी बीड जिल्हा परिषद प्रांगणात 'आकांक्षित हाट' प्रदर्शन आणि विक्री स्टॉलचं आयोजन करण्यात आलं आहे. आज आणि उद्या हे प्रदर्शन सुरू राहणार आहे.

**

नांदेड जिल्हा परिषदेच्या प्रांगणात उमेद- अभियानांतर्गत महिला स्वयंसहाय्यता समूहांनी तयार केलेल्या विविध वस्तू आणि दिवाळीच्या पारंपरिक फराळाच्या पदार्थांच्या विक्री प्रदर्शनाला आजपासून सुरुवात झाली. नागरिकांनी या दिवाळी महोत्सवाला आवर्जून भेट द्यावी, असं आवाहन प्रशासनानं केलं आहे.

****

पुण्यात सुरू असलेल्या ४१ व्या युवा राष्ट्रीय बास्केटबॉल अजिंक्यपद सीएम चषक स्पर्धेचा काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत समारोप झाला. या स्पर्धेत मुलींच्या गटात तमिळनाडू संघाने विजेतेपद तर कर्नाटक संघाने उपविजेतेपद पटकावलं. मुलांच्या गटात उत्तरप्रदेश संघाने विजेतेपद तर मध्यप्रदेश संघाने उपविजेतेपद पटकावलं.

****

भारताची बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधू हिनं जागतिक क्रमवारीत सहावं स्थान पटकावलं आहे. बीडब्ल्यूएफच्या ताज्या क्रमवारीत तिनं ही झेप घेतली असून, डिसेंबर २०२२ नंतरचं तिचं हे सर्वोच्च स्थान आहे.

****